महाराष्ट्र शासन

क्रमांक: एनजीसी ३५८४/७९७७/विशि-२,
[illegible] शिक्षण] व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- ९ मे, १९८४

प्रति,

कुलसचिव,
अमरावती विद्यापीठ, अमरावती.

विषय:- १९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांची नवीन महाविद्यालये उघडण्यास परवानगी देण्याबाबत.

महोदय,

१९८४-८५ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनाकडे विद्यापीठ कडून आलेल्या अर्जाचा विचार करून खाली दिलेल्या संस्थेकडून १९८४-८५ पासून नवीन महाविद्यालय उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर अमरावती विद्यापीठ अधिनियम १९८३ च्या कलम ५१[४] व [५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची अमरावती विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| नवीन महाविद्यालय उघडण्याचे ठिकाण. | विद्या शाखा | ज्या संस्थेस महाविद्यालय उघडण्याची परवानगी दिली आहे. त्या संस्थेचे नांव |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| | अमरावती विद्यापीठ | |
| अमरावती | कला, विज्ञान व वाणिज्य | यशोधरा महिला विकास मंडळ, फ्रेजरपुरा, अमरावती. |

२. शासनाने संलग्नीकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवरच आहे:-

१] शासनाकडून वर निर्देशित केलेल्या महाविद्यालयाला ३ वर्षे पर्यन्त कुठलेही अनुदान देण्यात येणार नाही.

२] ज्या विद्याशाखा उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे त्या प्रत्येक विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परिक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात कमीत कमी ४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला [आदिवासी क्षेत्रातील महाविद्यालयांकरिता ही विद्यार्थी संख्या कमीत कमी ३० अशी आहे.] तरच तो वर्ग १९८४-८५ पासून सुरु करावा. तसेच १९८४-८५ या शैक्षणिक वर्षाच्या

शेवटी होणा-या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेत कमीत कमी 30 विद्यार्थी बसले पाहिजे. [आदिवासी विभागातील महाविद्यालयात कमीत कमी २२.]

३. १९८४-८५ हे शैक्षणिक वर्ष सुरु होण्यास थोडा कालावधी असल्यामुळे अमरावती विद्यापीठास अशी विनंती करण्यात येत आहे की, सदर संस्थेला हे महाविद्यालय १९८४-८५ पासून सुरु करण्यास परवानगी द्यावी. स्थानिक चौकशी समिती, ॲकॅडमीक कौन्सिल, एक्झिक्युटिव्ह कौन्सिल व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून शासनाकडे प्राप्त झाल्यावर कलम ५१[६] व [७] यानुसार अंतिम संलग्निकरणाचे आदेश काढण्यास शासनाची हरकत नसेल असे गृहीत धरण्यात यावे.

४. अमरावती विद्यापीठास असेही कळविण्यात येत आहे की, संबंधित संस्थेस महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी देतांना संस्थेस विद्यापीठाने असे निःसंदिग्धपणे कळवावे की, प्रवेश सध्या तात्पुरत्या स्वरुपात देवून जर ४० विद्यार्थी प्रवेश घेतील तरच प्रत्यक्षात वर्ग सुरु करावेत. महाविद्यालयाला पुढे देण्यात येणारे संलग्नीकरण ही अट पूर्ण करण्यावरच अवलंबून राहील अन्यथा महाविद्यालयाला संबंधित विद्याशाखा बंद करावी लागेल. कलम ५१[६] व[७] नुसार संलग्निकरणाचा अंतिम प्रस्ताव शासनाकडे पाठवितांना ही अट पूर्ण झाली किंवा नाही याबद्दल प्रस्तावामध्ये उल्लेख करावा अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. पत्राची प्रतिलिपी संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यात येत आहे.

५. शासनाचे समक्रमांकाचे दि. १४/३/८४ चे पत्रान्वये निर्गमित केलेले आदेश कृपया रद्द समजण्यात यावेत.

[ डी. डी. साहिबवाला ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
अध्यक्षा, यशोधरा महिला विकास मंडळ, फ्रेजरपुरा, अमरावती यांना अग्रेषित. सदर संस्थेस महाविद्यालय उघडण्यास देण्यात येणारी परवानगी वरील परिच्छेद ३ व ४ मधील अटींवरच देण्यात आलेली आहे.

प्रतिलिपी:- शिक्षण संचालक[उच्च शिक्षण], महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय प्रशासन अधिकारी[उच्च शिक्षण अनुदान] अमरावती.

Principal
Takshashila Mahavidyalaya,
Amravati

केवारी/२७.४.